जावक क्र. ४८८८/२५
जिल्हा न्यायालय, वाशिम
दिनांक १०/११/२५

वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे कार्यालय

जाहीर प्रकटन

दि. ०७/११/२०२५

मा. जिल्हा न्यायालय, वाशिम या आस्थापनेवर कार्यरत तसेच सेवा निवृत्त मा. न्यायीक अधिकारी व कर्मचारी यांचे रंगीत ओळखपत्र तयार करून घेण्यासाठी खालील अटी व शर्तींच्या अधिन राहुन स्थानिक बाजारपेठेतील विविध पुरवठादाराकडुन दिनांक २४/११/२०२५ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

दर कराराच्या अटी व शर्ती :–

१. आदेश दिल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत ओळखपत्र तयार करूण देण्यात यावे.

२. ओळखपत्राचे १०० टक्के प्रदान हे प्रत्यक्षात पुरवठा झाल्यानंतर तसेच तयार करून देणा–याकडून पूरवठा करण्यात आलेल्या ओळखपत्राची मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांनी तपासणी केल्यानंतर सदरचे ओळखपत्र चांगल्या प्रतीच्या असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर त्रैमासीक पध्दतीने देयक प्रदान करण्यात येतील.

३. ओळखपत्रांचा पूरवठा जिल्हा न्यायालय, वाशिम येथे करणे बांधनकारक राहील.

४. पूरवठा करण्यात आलेल्या ओळखपत्रात काही त्रुटी आढळल्यास सदरच्या त्रुटी असलेली ओळखपत्रे तात्काळ बदलवून देणे अनिवार्य राहील.

५. तयार करून घेतलेल्या ओळखपत्र देयकाचे प्रदान हे अदाता नोंदणी पदध्तीद्वारे सरळ अदात्याचे बॅक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

६. लिफाफ्यावर ओळखपत्र तयार करून देणेसाठीचे दरपत्रक असे स्पष्ट नमुद करावे.

७. सदर दरपत्रक प्रक्रीया कोणत्याही टप्यावर रद्द करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांना राहिल.

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय
वाशिम.

प्रत रवाना,

१. अधिक्षक (वित्त व प्रशासन), जिल्हा न्यायालय, वाशिम नोटीस बोर्डावर प्रकाशनासाठी.

२. संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, वाशिम यांचे संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यासाठी.